सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# (सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६)

## सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हींग अँण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, दि एम्प्रेस मिल्स, नागपूर (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८६

(१५ ऑगस्ट, २०१३ पर्यंत सुधारित)

*

# (Maharashtra Act No. XLVI of 1986)

## The Central India Spinning, Weaving and Manufacturing Company Limited, The Empress Mills, Nagpur (Acquisition and Transfer of Undertaking) Act, 1986

*(As modified upto the 15th August, 2013)*

*


व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र राज्य मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

[किंमत रुपये : १०]

# सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हींग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, दि एम्प्रेस मिल्स, नागपूर (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८६

अनुक्रमणिका


उद्देशिका.

कलमे.

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

## प्रकरण दोन

### उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण

३. उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण आणि तो राज्य शासनाकडे निहित होणे व महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होणे.

४. निहितीकरणाचा सर्वसाधारण परिणाम.

५. पूर्वीच्या दायित्वांबद्दल मालक उत्तरदायी असणे.

६. उपक्रम नवीन शासकीय कंपनीत निहित करण्याचा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

## प्रकरण तीन

### रकमा देणे

७. रक्कम देणे.

८. पुढील रक्कम देणे.

## प्रकरण चार

### उपक्रमाचे व्यवस्थापन इत्यादी

९. उपक्रमाचे व्यवस्थापन, इत्यादी

१०. सर्व मत्ता, इत्यादी सुपूर्द करणे हे उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तींचे कर्तव्य असणे.

११. आपल्या कब्जात असलेली मत्ता, इत्यादीचे हिशेब देणे हे व्यक्तीचे कर्तव्य असणे.

## प्रकरण पाच

### मालकाच्या कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेल्या तरतुदी

१२. विवक्षित कर्मचाऱ्यांचे सेवायोजन.

१३. भविष्यनिर्वाह निधी व इतर निधी.

## प्रकरण सहा

## अधिदान आयुक्त

१४. अधिदान आयुक्तांची नियुक्ती.

१५. राज्य शासनाकडून आयुक्ताला होणारे प्रदान.

१६. राज्य शासनाचे अथवा महामंडळाचे अथवा नवीन शासकीय कंपनीचे विवक्षित अधिकार.

१७. आयुक्तांकडे हक्कमागण्या करणे.

१८. हक्कमागण्यांचा प्राथम्यक्रम.

१९. हक्कमागण्यांची तपासणी.

२०. हक्कमागण्या स्वीकृत करणे अथवा त्या फेटाळणे.

२१. आयुक्तांकडून मागणीदारांना होणारे पैशाचे संवितरण.

२२. मालकांना रकमांचे संवितरण.

२३. मालकांच्या मालकीची नसलेली यंत्रसामग्री, इत्यादींचा कब्जा पुढे चालू राहणे.

२४. असंवितरित किंवा मागणी न केलेली रक्कम सर्वसाधारण महसुली लेख्यात जमा करणे.

## प्रकरण सात

## संकीर्ण

२५. दायित्व ग्रहण.

२६. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

२७. राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा नवीन शासकीय कंपनीने अनुसंमत न केल्यास संविदा परिणामक्षम असण्याचे बंद होणे.

२८. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

२९. अधिकार सोपवणे.

३०. शास्ती.

३१. कंपन्यांनी केलेले अपराध.

३२. कंपनीचे समापन न्यायालयाकडून केले जाणार नाही.

३३. नियम करण्याचा अधिकार.

३४. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३५. सन १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

अनुसूची

## सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६[1]

**सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हींग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, दि एम्प्रेस मिल्स, नागपूर (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८६.**

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चार, असाधारण यात दिनांक २६ डिसेंबर, १९८६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हींग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड या उपक्रमाच्या संबंधात, देशाच्या अर्थव्यवस्थेच्या गरजांच्या दृष्टीने आवश्यक असलेली वस्त्र उत्पादने व कागद उत्पादने यांची निर्मिती, उत्पादन व वितरण पुढे चालू राहण्याची निश्चिती करून, त्याद्वारे सर्वसाधारण जनतेचे हित साध्य करता यावे यासाठी अशा उपक्रमाचे योग्य ते व्यवस्थापन व्हावे या दृष्टीने या उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण करण्यासाठी आणि तत्ससंबंधीच्या किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९५६ **ज्याअर्थी,** कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ पोट-कलम (१) खंड (दोन) मध्ये व्याख्या
चा १. केल्याप्रमाणे विद्यमान कंपनी असलेली सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हिंग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड ही सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हींग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड "एम्प्रेस मिल्स नागपूर" या नावाने संबोधण्यात येणारी कापड गिरणी व कागद निर्माण कारखाना यांची मिळून बनलेली संयुक्त कंपनी आपल्या उपक्रमामार्फत सूत, कापड व कागद निर्मितीत व उत्पादनात गुंतलेली होती;

**आणि ज्याअर्थी,** कंपनीने आपले परिसमापन स्वेच्छेने करण्याबाबत दाखल केलेला १९८६ चा विनंती अर्ज क्रमांक १८३ याच्या बाबतीत मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरत्या परिसमापकाची नियुक्ती करण्याबाबत आदेश काढला होता व कंपनीच्या परिसमापनाची कार्यवाही प्रलंबित होती;

**आणि ज्याअर्थी,** कंपनीने टाळेबंदी जाहीर केली होती व त्यामुळे सुमारे ६,००० हून अधिक कामगार बेकार झाले आहेत व दिनांक ३ मे १९८६ पासून या उपक्रमाचे कार्य बंद पडलेले आहे;

**आणि ज्याअर्थी,** देशाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक म्हणून उक्त कंपनी तिची वस्त्रनिर्मिती व कागद उत्पादन आणि त्याचे वितरण ताब्यात घेऊन ती पुढे चालू ठेवून सामान्य जनतेच्या व उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांच्या हिताची निश्चिती करण्याकरिता उक्त कंपनीच्या उपक्रमाचे संपादन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबीसांठी तरतूद करणे इष्ट होते;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाच्या अनुच्छेद ३९ च्या खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वाचे पालन करण्याबाबतचे राज्याचे धोरण अंमलात आणण्यासाठी असे संपादन करावयाचे आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, कायदा करण्यासाठी ज्यामुळे तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक झाले होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या
१९८६ चा राज्यापालांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी दिनांक ३ ऑक्टोबर १९८६ रोजी सेंट्रल
महाराष्ट्र इंडिया स्पिनिंग, विव्हिंग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड, दि एम्प्रेस मिल्स, नागपूर (उपक्रमांचे
अध्यादेश
क्रमांक ५. संपादन व हस्तांतरण) अध्यादेश, १९८६ प्रख्यापित केला होता.

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९८६, भाग पाच, असाधारण पी.पी.इं.पृ.५५१-५५२, दिनांक २० ऑक्टोबर १९८६ पहा.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हिंग अ‍ॅण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, दि एम्प्रेस मिल्स, नागपूर (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८६ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ ऑक्टोबर १९८६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर—

(अ) 'नेमलेला दिवस' म्हणजे हा अधिनियम अंमलात येण्याची तारीख ;

(ब) "बँक" म्हणजे —

(एक) स्टेट बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९५५ अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक ; १९५५ चा २३.

(दोन) स्टेट बँक ऑफ इंडिया (दुय्यम बँक) अधिनियम, १९५९ यात व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे दुय्यम बँक ; १९५९ चा ३८.

(तीन) बँक व्यवसाय कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या कलम ३ अन्वये किंवा बँक व्यवसाय कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या कलम ३ अन्वये स्थापना करण्यात आलेली तत्सम नवीन बँक ; १९७० चा ५. १९८० चा ४०.

(चार) रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ याच्या कलम २ च्या खंड (ई) मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे अनुसूचित बँक असेल अशी इतर कोणतीही बँक ; १९३४ चा २.

(क) "आयुक्त" म्हणजे ; कलम १४ अन्वये नेमलेला अधिदान आयुक्त ; १९५६ चा १.

(ड) "महामंडळ" म्हणजे, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये शासकीय कंपनी म्हणून नोंदलेले महाराष्ट्र राज्य वस्त्रनिर्माण महामंडळ ;

(ई) " संस्था " म्हणजे,—

(एक) सर्वसाधारण विमा उद्योग (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२ याच्या कलम ९ अन्वये स्थापन झालेले सर्वसाधारण विमा महामंडळ; १९७२ चा ५७.

(दोन) कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३, खंड (दोन) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कंपनी असलेले विद्यमान भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ; १९५७ चा १.

(तीन) भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेली भारतीय औद्योगिक विकास बँक; १९६४ चा १८.

(चार) भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ अधिनियम, १९४८ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेले भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ; १९४८ चा १५.

१९८४चा ६२. (पाच) भारतीय औद्योगिक पुनर्रचना बँक अधिनियम, १९८४ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेले भारतीय औद्योगिक पुनर्रचना महामंडळ ;

१९५६ चा ३१. (सहा) भारतीय आयुर्विमा महामंडळ अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेले भारतीय आयुर्विमा महामंडळ ;

१९५१ चा ६३. (सात) राज्य वित्त महामंडळ अधिनियम, १९५१ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेले महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ;

१९५६ चा १. (आठ) कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदलेली महाराष्ट्र औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ ही कंपनी ; किंवा

१९६३ चा ५२. (नऊ) भारतीय युनिट ट्रस्ट अधिनियम, १९६३ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेला भारतीय युनिट ट्रस्ट ;

१९५६ चा १. (फ) " नवीन शासकीय कंपनी " म्हणजे, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये हा उपक्रम जिच्याकडे निहित करण्याचे निदेश देण्यात आले आहेत अशी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन केलेली व नोंदणी केलेली (दुय्यम शासकीय कंपनीसह) शासकीय कंपनी ;

(ग) " विहित " म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित ;

१९५६ चा १. (ह) " मालक " म्हणजे, भारतीय कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३, पोट-कलम (१), खंड (दोन), मध्ये व्याख्या केल्याप्रमाणेची आर्मी ॲन्ड नेव्ही बिल्डींग, १४८, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली सेंट्रल इंडिया स्पिनिंग वीव्हींग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड ही विद्यमान कंपनी, व त्यामध्ये मुंबई उच्च न्यायालयातील, १९८६ चा विनंती अर्ज क्रमांक १८३ अनुसार नियुक्त, करण्यात आलेल्या परिसमापकाचा समावेश होतो ;

(आय) " अनुसूची " म्हणजे या अधिनियमास जोडलेली अनुसूची ;

(जे) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या संबंधात "विनिर्दिष्ट तारीख" म्हणजे, शासन, त्या तरतुदीच्या प्रयोजनार्थ, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी तारीख आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळ्या तारखा विनिर्दिष्ट करता येतील;

(के) " उपक्रम " म्हणजे सेंट्रल इंडिया स्पिनिंग वीव्हिंग ॲंड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड, " दि एम्प्रेस मिल्स, नागपूर " या नावाचा औद्योगिक उपक्रम ;

(ल) या अधिनियमाच्या वापरण्यात आलेले व व्याख्या न करण्यात आलेले, परंतु
१९५६ कंपनी अधिनियम, १९५६ मध्ये व्याख्या करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे
चा १. त्या अधिनियमात नेमून देण्यात आलेलेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण

उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण आणि तो राज्य शासनाकडे निहित होणे व महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होणे.

३. (१) नेमलेल्या दिवशी, हा उपक्रम आणि मालकांचे या उपक्रमाच्या संबंधातील हक्क, स्वत्वाधिकार आणि हितसंबंध हे, या अधिनियमाच्या प्रभावाने, राज्य शासनाकडे हस्तांतरित होऊन पूर्णपणे निहित होतील.

(२) पोट-कलम (१) च्या प्रभावाने, राज्य शासनाकडे निहित झालेला उपक्रम अशा रीतीने तो निहित झाल्यानंतर ताबडतोब महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होईल.

निहितीकरणाचा सर्वसाधारण परिणाम.

४. (१) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, मालकाच्या मालकीची, त्याच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणाखाली असणारी भारतातील किंवा भारताबाहेरील सर्व मत्ता, हक्क, पट्टेदारी, अधिकार, प्राधिकार व विशेषाधिकार आणि जमिनी, इमारती, कर्मशाळा, भांडारे, उपकरणे, यंत्रसामग्री व साधनसामग्री, रोख शिलकी रकमा, हातातील रोकड, राखीव निधी, गुंतवणुका, पुस्तकी ऋणे धरून सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि अशा मालमत्तेवरील किंवा तिच्यातून निर्माण होणारे इतर सर्व हक्क व हितसंबंध आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही स्वरूपाची सर्व लेखापुस्तके, नोंदवह्या व इतर सर्व दस्तऐवज यांचा या उपक्रमामध्ये समावेश होतो, असे समजण्यात येईल.

(२) कलम ३ अन्वये राज्य शासनकडे निहित झालेली उपरोक्त सर्व मालमत्ता ही अशा निहितीकरणामुळे, तिच्यावर परिणाम करणारी कोणतीही विश्वस्तव्यवस्था, आबंधन, गहाणवटीचे व्यवहार, प्रभार, धारणाधिकार व इतर सर्व भार यांपासून मुक्त व निर्वेध होईल आणि अशा मालमत्तेचा वापर कोणत्याही प्रकारे निर्बंधित करणारी कोणत्याही न्यायालयाची, न्यायाधिकरणाची किंवा अन्य प्राधिकरणाची कोणतीही जप्ती, व्यादेश, हुकूमनामा किंवा आदेश मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) या अधिनियमांन्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या मालमतेचा प्रत्येक गहाणधारक आणि अशा मालमत्तेवर किंवा तिच्या संबंधात कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा अन्यहितसंबंध असणारी प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा कालमर्यादेत आणि कशा रीतीने, अशा गहाणवटीची, प्रभाराची, धारणाधिकाराची किंवा अन्य हितसंबंधाची माहिती आयुक्तांना कळवील.

(४) शंकानिवारणार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोट-कलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या गहाणधारकाला किंवा अशा कोणत्याही मालमत्तेचा किंवा मालमत्तेच्या संबंधातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य हितसंबंध धारण करणाऱ्या कोणत्याही अन्य व्यक्तीला त्याच्या हक्कांनुसार व हितसंबंधांनुसार, कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेतून आणि कलम ८ मध्ये उल्लेखलेल्या रकमेतूनही, गहाणधन किंवा इतर येणे रकमा पूर्णतः किंवा अंशतः चुकत्या केल्या जाण्याची मागणी करण्याचा हक्क असेल, परंतु असे गहाण, प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य हितसंबंध हे राज्य शासनाकडे, महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे निहित झालेल्या कोणत्याही अशा मालमत्तेविरुद्ध बजावणीयोग्य नसतील.

(५) कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या उपक्रमाच्या संबंधात, नेमलेल्या दिवसापूर्वी कोणत्याही वेळी मालकांना दिलेले आणि त्या दिवसाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही लायसन किंवा अन्य संलेख हा, अशा उपक्रमाच्या संबंधात आणि अशा उपक्रमाच्या प्रयोजनार्थ, त्या लायसनच्या वा विलेखाच्या मतितार्थानुसार नेमलेल्या दिवशी व त्यानंतर अंमलात असण्याचे चालू राहील आणि असा उपक्रम कलम ३ अन्वये महामंडळाकडे किंवा कलम ६ अन्वये नवीन शासकीय कंपनीकडे निहित झाल्यानंतर जणू काही महामंडळ किंवा प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनी यांनाच ते लायसन किंवा अन्य संलेख दिला असल्याप्रमाणे महामंडळाचे किंवा नवीन शासकीय कंपनीचे नाव अशा लायसनमध्ये किंवा अन्य संलेखामध्ये मूळ नावाऐवजी दाखल केले असल्याचे मानण्यात येईल आणि मालकांनी त्यासंबंधीच्या अटींच्या अनुसार ते जेवढ्या उर्वरित कालावधीसाठी धारण केले असते तेवढ्या उर्वरित कालावधीसाठी महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी ते धारण करील.

**पूर्वीच्या दायित्वांबद्दल मालक उत्तरदायी असणे.**

**५.** (१) नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबाबतचे उपक्रमाच्या संबंधातील प्रत्येक दायित्व हे मालकांचे दायित्व असेल आणि त्यासंबंधाचा हक्क त्यांच्याविरुद्ध बजावता येईल. राज्य शासन किंवा महामंडळ यांच्या किंवा जेथे एखादा उपक्रम कलम ६ अन्वये नवीन शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आला असेल येथे त्या नवीन शासकीय कंपनीच्या विरुद्ध तो दायित्व हक्क बजावता येणार नाही.

(२) शंकानिवारणार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की,—

(अ) या कलमात किंवा या अधिनियमाच्या अन्य तरतुदींत अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून अन्यथा कोणतेही दायित्व हे, राज्य शासनाच्या किंवा महामंडळाच्या किंवा जेथे तो उपक्रम कलम ६ अन्वये अन्य एखाद्या नवीन शासकीय कंपनीकडे निहित केला असेल तेथे, त्या नवीन शासकीय कंपनीच्या विरुद्ध बजावता येणार नाही;

(ब) असा कोणताही कब्जा, दावा किंवा विवाद त्या उपक्रमाबाबत नेमलेल्या दिवसापूर्वी उद्‌भवला असून त्यासंबंधी कोणत्याही न्यायालयाने, न्यायाधिकरणाने किंवा अन्य प्राधिकरणाने नेमलेल्या दिवशी किंवा नेमलेल्या दिवसानंतर जो कोणताही निवाडा, हुकूमनामा किंवा आदेश संमत केला असेल तो राज्य शासनाच्या किंवा महामंडळाच्या विरुद्ध अथवा कलम ६ अन्वये तो उपक्रम अन्य कोणत्याही नवीन शासकीय कंपनीकडे निहित होण्याचे निदेशित केले असल्यास, अशा नवीन शासकीय कंपनीच्या विरुद्ध बजावता येणार नाही ;

(क) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून नेमलेल्या दिवसापूर्वी मालकांनी ओढवून घेतलेले कोणतेही दायित्व, राज्य शासन अथवा महामंडळ यांच्या अथवा कलम ६ अन्वये उपक्रम अन्य एखाद्या नवीन शासकीय कंपनीत निहित करण्याचे निदेशित केले असेल त्या बाबतीत अशी नवीन शासकीय कंपनी यांच्याविरुद्ध बजावता येणार नाही ;

(ड) या अधिनियमाच्या कलम १२ ची पोट-कलमे (१) आणि (२) अथवा त्याच्या अन्य कोणत्याही तरतुदी अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा अथवा कोणतीही संविदा, करारनामा, समझोता अथवा कोणतेही न्यायालय, न्यायधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांचा निवाडा किंवा हुकूमनामा किंवा आदेश यांत काहीही अंतर्भूत

असेल तरी, नेमलेल्या दिवसापूर्वीचा काही काळ कोणत्याही कर्मचाऱ्याने उपक्रमात केलेल्या नोकरी संबंधात त्याने मालकाविरुद्ध केलेल्या कोणत्याही स्वरूपाच्या मागण्यांबाबतचे दायित्व, राज्य शासन अथवा महामंडळ किंवा कलम ६ अन्वये उपक्रम अन्य एखाद्या नवीन शासकीय कंपनीत निहित करण्याचे निदेशित केले असेल त्या बाबतीत अशी नवीन शासकीय कंपनी यांच्याविरूद्ध बजावता येणार नाही.

६. (१) कलमे ३ आणि ४ यांत काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये उपक्रम महामंडळाकडे निहित झाला असेल त्या बाबतीत, राज्य शासन, त्यास लादणे योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीनतेने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, जो उपक्रम व ज्याच्या संबंधातील मालकांचा हक्क, स्वत्वाधिकार वा हितसंबंध राज्य शासनाकडे निहित करण्यात आले होते व हस्तांतरणानंतर ते कलम ३ अन्वये महामंडळाकडे निहित झालेले आहेत, तो उपक्रम व तो हक्क, स्वत्वाधिकार व हितसंबंध, महामंडळाकडे निहित असण्याचे चालू राहण्याऐवजी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपासून नवीन शासकीय कंपनीत निहित होतील.

(२) मालकांचा उपक्रमासंबंधातील हक्क, स्वत्वाधिकार व हितसंबंध पोट-कलम (१) अन्वये नवीन शासकीय कंपनीत निहित होतील तेव्हा, अशी शासकीय कंपनी, असे निहितीकरण झाल्याच्या तारखेस व तेव्हापासून अशा उपक्रमाच्या संबंधात मालक झाली असल्याचे मानण्यात येईल आणि उपक्रमाच्या संबंधातील राज्य शासनाचे व महामंडळाचे सर्व हक्क व दायित्वे ही, अशा निहितीकरण्याच्या तारखेस व तेव्हापासून अशा शासकीय कंपनीचे हक्क व दायित्वे झाली असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण तीन

## रकमा देणे

७. कलम ३ अन्वये, तो उपक्रम व मालकांचा त्या उपक्रमाच्या संबंधातील हक्क, स्वत्वाधिकार व हितसंबंध, राज्य शासनाकडे हस्तांतरित व निहित करण्याबद्दल राज्य शासन, मालकांना सहा कोटी दहा लाख रुपये इतकी रक्कम रोखीने आणि प्रकरण सहामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने देईल:

परंतु, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालकांच्या कोणत्याही दायित्वाची राज्य शासनाने किंवा महामंडळाने अनुसूचीमध्ये उल्लेखिलेल्या प्राथम्यक्रमानुसार फेड केली असेल तर या कलमान्वये मालकाला द्यावयाची रक्कम तेवढ्या रकमेने कमी होईल.

८. (१) कलम ७ च्या तरतुदींनुसार प्रदेय होणाऱ्या रकमेवर, नेमलेल्या दिवसापासून सुरू होऊन राज्य शासन ही रक्कम आयुक्तांच्या स्वाधीन करील त्या तारखेला संपणाऱ्या कालावधीकरिता द.सा.द.शे. चार दराने सरळ व्याज लागू होईल.

(२) कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेच्या जोडीने, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने परिगणना केलेली व्याजाची रक्कम राज्य शासन मालकांना देईल.

(३) शंकानिरसनासाठी याद्वारे घोषित करण्यात येते की, कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे किंवा महामंडळाकडे निहित झालेल्या उपक्रमाच्या संबंधातील मालाकांची दायित्वे ही, मालकांच्या धनकोंचे हक्क व हितसंबंध यांच्या अनुसार, कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमांमधून आणि तसेच पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम यांमधून देखील चुकती करण्यात येतील.

## प्रकरण चार

### उपक्रमाचे व्यवस्थापन, इत्यादी

उपक्रमाचे व्यवस्थापन, इत्यादी.

९. (१) कलम ३, पोट-कलम (१) अन्वये ज्यांच्या संबंधातील हक्क, स्वत्वाधिकार व हितसंबंध हे राज्य शासनाकडे निहित करण्यात आलेले आहेत. त्या उपक्रमाचा कारभार व धंदा यांवर सर्वसाधारण अधीक्षण, निदेशन, नियंत्रण व व्यवस्थापन करण्याचा अधिकार —

(अ) कलम ३ च्या पोट-कलम (२) मधील तरतुदींच्या आधारे. महामंडळाकडे किंवा महामंडळ लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा व्यक्तीकडे आणि अशा प्रमाणात किंवा अशा मर्यादांपर्यंत निहित होईल; किंवा

(ब) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाकडून निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत, नवीन शासकीय कंपनीकडे किंवा नवीन शासकीय कंपनी लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा व्यक्तींकडे आणि अशा प्रमाणात किंवा अशा मर्यादांपर्यंत निहित होईल.

आणि त्यानंतर, मालकांना आपल्या उपक्रमाच्या संबंधात ज्या ज्या अधिकारांचा वापर करण्याचा व ज्या ज्या गोष्टी करण्याचा प्राधिकार देण्यात आला होता त्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचा व त्या सर्व गोष्टी करण्याचा हक्क फक्त महामंडळाला किंवा नवीन शासकीय कंपनीला अथवा यथास्थिति, अशा व्यक्तीला असेल. इतर कोणाही व्यक्तींना असा हक्क असणार नाही.

(२) पोट-नियम (१) मध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी महामंडळाने किंवा अशा नवीन शासकीय कंपनीने उपक्रमाच्या वेगवेगळ्या युनिटांची आणि कार्यालयाच्या कामांची आणि त्यात नोकरीस असलेल्या कर्मचारीवर्गाची पुनर्रचना करणे व त्यायोगे अशा महामंडळाला किंवा अशा नवीन शासकीय कंपनीला योग्य वाटेल तितकी कर्मचारी संख्या ठेवून अशा युनिटांची व कार्यालयाची पुनर्रचना करणे हे विधिसंमत असेल.

सर्व मत्ता, इत्यादी सुपूर्द करणे हे उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीचे कर्तव्य असणे.

१०. (१) उपक्रमाचे व्यवस्थापन महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे निहित झाल्यानंतर, असे निहितीकरण होण्याच्या निकटपूर्वी, न्यायालयाने नेमलेला परिसमापक धरून उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तींनी उपक्रमाच्या संबंधातील त्यांच्या कब्जात किंवा अभिरक्षेत असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व मत्ता, लेखापुस्तके, नोंदवह्या आणि इतर दस्तऐवज महामंडळाच्या किंवा प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीच्या स्वाधीन करणे हे बंधनकारक असेल.

(२) राज्य शासन प्रकरणाच्या परिस्थितीनुसार इष्ट वाटतील असे निदेश महामंडळाला किंवा नवीन शासकीय कंपनीला देऊ शकेल आणि महामंडळाला किंवा अशा नवीन शासकीय कंपनीला तसे करणे आवश्यक वाटेल तर, उपक्रमाचे व्यवस्थापन कशा रीतीने करण्यात यावे याबाबत किंवा असे व्यवस्थापन करीत असताना उद्भवणाऱ्या अन्य कोणत्याही बाबीसंबंधात सूचना मिळाव्यात यासाठी कोणत्याही वेळी राज्य शासनाकडे अर्जही करता येईल.

आपल्या कब्जात असलेली मत्ता, इत्यादीचे हिशेब देणे हे व्यक्तीचे कर्तव्य असणे.

११. (१) या अधिनियमान्वये राज्य शासनाकडे अथवा महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आलेल्या उपक्रमाच्या संबंधातील कोणत्याही मत्ता, पुस्तके, दस्तऐवज अथवा इतर कागदपत्रे नेमलेल्या दिवशी जिच्या कब्जात किंवा अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असतील अशी कोणतीही व्यक्ती उक्त मत्ता, पुस्तके, दस्तऐवज किंवा इतर कागदपत्रे यांचा हिशेब राज्य शासनास, महामंडळास अथवा, प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीस देण्यास जबाबदार असेल, आणि ती राज्य शासनाच्या अथवा, प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीस देण्यास जबाबदार असेल, आणि ती राज्य शासनाच्या अथवा महामंडळाच्या किंवा अशा शासकीय कंपनीच्या अथवा याबाबतीत राज्य शासन, महामंडळ किंवा अशी शासकीय कंपनी विनिर्दिष्ट करील अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तीच्या सुपूर्द करील.

(२) राज्य शासनाला किंवा महामंडळाला किंवा उपरोक्त शासकीय कंपनीला या अधिनियमान्वये राज्य शासनाकडे अथवा महामंडळाकडे अथवा अशा शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आलेल्या उपक्रमाचा कब्जा घेण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करता येतील किंवा त्याबाबत व्यवस्था करता येईल.

(३) कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाकडे आणि त्या कलमाच्या पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या आधारे महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे जो उपक्रम निहित करण्यात आलेला आहे त्याच्याशी संबंधित अशी नेमलेल्या दिवशी असलेली त्याची सर्व मालमत्ता व मत्ता यांची संपूर्ण जंत्री याबाबतीत राज्य शासन देईल तेवढ्या कालावधीत मालक शासनाला सादर करतील, आणि या प्रयोजनास्तव राज्य शासन अथवा महामंडळ मालाकांना योग्य त्या सर्व सुविधा देईल.

## प्रकरण पाच

## मालकांच्या कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेल्या तरतुदी

विवक्षित कर्मचाऱ्यांचे सेवायोजन.

१२. (१) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ याच्या अर्थान्तर्गत जी व्यक्ती कामगार आहे १९४७
आणि नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी जिला उपक्रमाच्या नोकरीत घेण्यात आले आहे अशा चा १४.
व्यक्तीच्या सेवा, उपक्रमाच्या पुनर्रचनेतून पुन्हा जुळणी करण्यात आलेल्या महामंडळाच्या युनिटांची गरज लक्षात घेता, आवश्यक आहेत असे महामंडळाचे मत असेल तर, अशी व्यक्ती, महामंडळाने तिची नियुक्ती केल्याच्या दिनांकापासून महामंडळाची कर्मचारी होईल आणि उपक्रमाच्या संबंधातील हक्क महामंडळाकडे हस्तांतरित होऊन त्यांच्याकडे निहित झाले नसते तर त्या व्यक्तीला निवृत्तिवेतन, उपदान व इतर बाबींच्या संबंधात जे हक्क आणि विशेषाधिकार अनुज्ञेय झाले असते तेच हक्क व विशेषाधिकार यांसह ती महामंडळाचे पद धारण करील किंवा त्याच्या सेवेत राहील, आणि अशा महामंडळातील तिची सेवा यथोचितरीत्या समाप्त करण्यात आल्याखेरीज व येईतोपर्यंत किंवा तिचे वेतन व सेवेच्या अटी व शर्ती यांत महामंडळाकडून रीतसर फेरबदल करण्यात येईतोपर्यंत ती महामंडळाच्या सेवेत असण्याचे चालू राहील.

(२) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ याच्या अर्थान्तर्गत जी व्यक्ती कामगार नाही १९४७
आणि नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी जिला उपक्रमाच्या नोकरीत घेण्यात आले आहे, अशा चा १४.
व्यक्तीच्या सेवा उपक्रमाच्या पुनर्रचनेतून पुन्हा जुळणी करण्यात आलेल्या महामंडळाच्या युनिटांची किंवा कार्यालयांची गरज लक्षात घेता, आवश्यक आहेत असे महामंडळाचे मत असेल

तर, अशी व्यक्ती महामंडळाने तिची नियुक्ती केल्याच्या तारखेपासून, महामंडळाची कर्मचारी होईल आणि महामंडळाकडून निर्धारित करण्यात येतील अशा अटींवर व शर्तीवर महामंडळात पद धारण करील किंवा त्याच्या सेवेत राहील.

(३) (अ) नेमलेल्या दिवसापूर्वी मालकाने कामावर ठेवलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सेवा—

(एक) महामंडळाने, पोट-कलम (१)) किंवा (२) अन्वये अशा व्यक्तीस नियत तारखेपूर्वी कामावर ठेवलेले नसेल त्याबाबतीत, नियत तारखेस, आणि

(दोन) महामंडळाने पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये अशा व्यक्तीस नियत तारखेपूर्वी कामावर ठेवलेले नसेल त्याबाबतीत, त्याच्या नियुक्तीच्या तारखेस.

समाप्त करण्यात येतील.

(ब) खंड (क) च्या पोट-खंड (१) अन्वये जिच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत अशा व्यक्तीस, अधिकारत:महामंडळातील नोकरीसाठी दावा सांगण्याचा हक्क असणार नाही.

(४) (अ) पोट-कलम (३), खंड (क) च्या पोट-खंड (१) अन्वये, जिच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत अशा प्रत्येक व्यक्ती,—

(एक) ती व्यक्ती औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या अर्थानुसार कामगार असेल
१९७२ त्याबाबतीत उपदान प्रदान अधिनियम, १९७२ आणि औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ यांच्या
चा ३९. तरतुदीनुसार उपदानाच्या रकमा आणि नोकर कपातीपोटी किंवा काम बंद पडल्यामुळे त्यापोटी
१९४७ देण्यात येणाऱ्या भरपाईच्या रकमा मिळण्यास, आणि
चा १४.

(दोन) ती व्यक्ती असा कामगार नसेल त्याबाबतीत, उपदानाची रक्कम मिळण्यास हक्कदार असेल:

परंतु, जिच्या सेवा तिच्या नियत वयोमानानुसार नियत तारखेस किंवा त्यापूर्वी समाप्त करण्यात आल्या असतील अशा व्यक्तीस, नोकर कपातीपोटी किंवा काम बंद पडल्यामुळे त्यापोटी देण्यात येणाऱ्या भरपाईच्या रकमा मिळण्यास, आणि

(ब) प्रकरण सहामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि खंड (अ) अन्वये उपदानाच्या आणि नोकरकपातीपोटी किंवा काम बंद पडल्यामुळे त्यापोटी देण्यात येणाऱ्या भरपाईच्या रकमा देणे हे मालकांचे दायित्व असेल तरी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या प्राथम्यक्रमानुसार, राज्य शासनाकडून किंवा महामंडळाकडून अशा दायित्वाची फेड करण्यात येईल आणि राज्य शासनाने किंवा महामंडळाने अशा दायित्वाची फेड केल्यानंतर मालकाच्या बाजूने अशातऱ्हेने फेड केलेल्या दायित्वाच्या मर्यादेइतक्याच दायित्वाची फेड झालेली असेल.

(५) ज्या बाबतीत,—

(अ) उपक्रमामध्ये नोकरीस असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या सेवा नेमलेल्या दिवसापूर्वी—

(एक) कोणत्याही संविदेच्या शर्तीअन्वये किंवा सेवेच्या शर्तीअन्वये किंवा अन्य प्रकारे; अथवा

(दोन) पोट-कलम (३) अन्वये

समाप्त करण्यात आल्या असतील, आणि

(ब) ती व्यक्ती वेतनाची किंवा मजुरीची थकबाकी किंवा न घेतलेल्या रजेबद्दलचे कोणतेही प्रदान किंवा उपदानाच्या रुपाने अथवा नोकरकपातीपोटी देण्यात येणाऱ्या भरपाईच्या रूपाने मिळालेले प्रदान नसेल असे इतर प्रदान मिळण्यास हक्कदार असेल तर,

त्या बाबतीत, अशा व्यक्तीस, कलम ७ च्या परंतुकान्वये राज्य शासनाने किंवा महामंडळाने जेवढ्या रकमेच्या दायित्वाची फेड केलेली असेल तेवढ्या दायित्वाखेरीजकरून उक्त रकमा मिळण्यासाठी उपक्रमांच्या मालकाविरुद्धच्या बाबतीत आपला हक्क बजावता येईल, मात्र राज्य शासनाविरुद्ध किंवा महामंडळाविरुद्ध असा हक्क बजावता येणार नाही:

परंतु, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ आणि उपदान प्रदान अधिनियम, १९७२ यामध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी,— १९४७ चा १४. १९३६ चा ४.

(अ) राज्य शासन किंवा महामंडळ,—

उपक्रम ज्या दिवशी बंद झाला असेल त्या दिवसापासून सुरू होणाऱ्या आणि अशी कोणतीही व्यक्ती ज्या दिवशी महामंडळाची कर्मचारी झाली असेल अशा दिवशी किंवा प्रकरणपरत्वे, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या तरतुदींनुसार अशी सेवा समाप्त झाली आहे किंवा नाही हे लक्षात न घेता ज्या दिवशी तिची सेवा समाप्त करण्यात आली असेल त्या दिवशी संपणाऱ्या कालावधीसाठी,— १९७२ चा ३९. १९४७ चा १४.

(एक) पोट-कलम (१) अन्वये जी व्यक्ती महामंडळाची कर्मचारी झाली आहे अशा कोणत्याही व्यक्तीस उपदानाचे प्रदान करण्यास किंवा वेतनाची कोणतीही थकबाकी देण्यास किंवा;

(दोन) पोट-कलम (३), खंड (अ) च्या उप-खंड (१) अन्वये जिच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत अशा कोणत्याही व्यक्तीस नोकरकपातीपोटी उपदानाचे प्रदान करण्यास, किंवा वेतनाची कोणतीही थकबाकी देण्यास अथवा उपक्रम बंद पडल्यामुळे त्यापोटी भरपाई देण्यास, दायी राहणार नाही.

(ब) पोट-कलम (३), खंड (अ) च्या उप-खंड (दोन) अन्वये, एखाद्या व्यक्तीच्या सेवा समाप्त करण्यात आल्या यावरून पोट-कलम (१) अन्वये ती महामंडळाची कर्मचारी झाल्यानंतर अशी व्यक्ती उपदान मिळण्यास हक्कदार होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या प्रकरणात—

(अ) "महामंडळ" या शब्दप्रयोगात नवीन "शासकीय कंपनी" हा शब्दप्रयोग समाविष्ट आहे; आणि

(ब) "नियत दिनांक" या शब्दप्रयोगाचा अर्थ, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशी तारीख असा आहे ;

भविष्यनिर्वाह निधी व इतर निधी.

**१३.** (१) जेव्हा उपक्रमात नोकरीला असलेल्या व्यक्तींच्या लाभासाठी मालकांनी भविष्यनिर्वाह निधी, वयोनिवृत्ती निधी, कल्याण निधी अथवा अन्य कोणताही निधी स्थापन केला असेल त्याबाबतीत, महामंडळाकडे ज्याच्या सेवा नवीन नियुक्तीवर पुढे चालू ठेवण्यात आल्या असतील त्या अधिकाऱ्यांची किंवा कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेल्या रकमा नेमलेल्या दिवशी अशा भविष्यनिर्वाह निधीच्या, वयोनिवृत्ती निधीच्या, कल्याण निधीच्या किंवा इतर निधीच्या खाती जमा असलेल्या रकमेतून महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये महामंडळाकडे हस्तांतरित झालेल्या पैशांचा व्यवहार विहित करण्यात येईल अशा रीतीने महामंडळ करील.

## प्रकरण सहा

## अधिदान आयुक्त

अधिदान आयुक्तांची नियुक्ती.

१४. (१) राज्य शासन, कलमे ७ व ८ अन्वये मालकांना प्रदेय असलेल्या रकमा त्यांना संवितरित करण्याच्या प्रयोजनासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिदान आयुक्तांची नियुक्ती करील.

(२) आयुक्ताला सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाला योग्य वाटतील अशा व्यक्तीची नियुक्ती करता येईल आणि त्यानंतर आयुक्त, या अधिनियमान्वये त्याला वापरता येतील अशा सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठीसुद्धा, अशा एका किंवा अधिक व्यक्तींना प्राधिकृत करू शकेल आणि निरनिराळ्या अधिकारांचा वापर करण्यासाठी निरनिराळ्या व्यक्तींना प्राधिकृत करता येईल.

(३) आयुक्तास वापरता येतील अशा अधिकारांपैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, असे अधिकार तिला प्राधिकाराच्या अन्वये देण्यात आलेले नसून जणू काही या अधिनियमान्वये प्रत्यक्षात प्रदान करण्यात आलेले आहेत असे मानून त्याच रीतीने व तेवढ्याच परिणामकारक रीतीने ते वापरता येतील.

(४) या कलमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या आयुक्ताचे व इतर व्यक्तींचे वेतन आणि भत्ते राज्याच्या एकत्रित निधीतून देण्यात येतील.

राज्य शासनाकडून आयुक्ताला होणारे प्रदान.

१५. (१) राज्य शासन, विनिर्दिष्ट तारखेपासून तीस दिवसांच्या आत, मालकांना प्रदान करण्यासाठी आयुक्ताला पुढील प्रमाणे रोख रकमा देईल:—

(अ) कलम १२, पोट-कलम (४) च्या खंड (ब) अन्वये दिलेल्या कोणत्याही रकमा वजा करून, कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेएवढी रक्कम; आणि

(ब) कलम ८ अन्वये मालकांना देय असलेल्या रकमेएवढी रक्कम.

(२) राज्याच्या लोकलेख्यामध्ये आयुक्ताच्या नावे राज्य शासनामार्फत एक ठेव खाते उघडण्यात येईल आणि या अधिनियमान्वये आयुक्ताला देण्यात येणारी प्रत्येक रक्कम त्याच्याकडून उक्त ठेव खात्यामध्ये जमा करण्यात येईल आणि उक्त ठेव खात्याचा व्यवहार आयुक्ताकडून करण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये आयुक्ताला ज्याच्या संबंधात प्रदान केले असेल त्या उपक्रमाच्या संबंधीचे अभिलेख आयुक्ताकडून ठेवण्यात येतील.

(४) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या ठेव खात्यात जमा असलेल्या रकमेवर उपार्जित होणाऱ्या व्याजाचा विनियोग मालकांच्या लाभासाठी करण्यात येईल.

राज्य शासनाचे अथवा महामंडळाचे अथवा नवीन शासकीय कंपनीचे विवक्षित अधिकार.

१६. (१) राज्य शासन अथवा महामंडळ अथवा, प्रकरणपरत्वे, कलम ६, पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाकडून निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत नवीन शासकीय कंपनी राज्य शासनाकडे किंवा महामंडळाकडे किंवा अशा शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आलेल्या उपक्रमाच्या संबंधातील मालकांस येणे असलेली आणि नेमलेल्या दिवसाच्या नंतर वसूल केलेली अशी कोणतीही रक्कम, मग ती वसुली नेमलेल्या दिवसापूर्वीच्या कालावधीशी संबंधित असली तरी हरकत नाही, विनिर्दिष्ट तारखेपर्यंत स्वीकारण्यास हक्कदार असेल; इतर कोणीही व्यक्ती हक्कदार असणार नाही. तिला/त्याला आयुक्ताकडे हक्कमागणी करता येईल; आणि राज्य

शासनाकडून अथवा महामंडळाकडून अथवा अशा शासकीय कंपनीकडून ज्यासंबंधात अशा दायित्वाची फेड करण्यात आली आहे त्या बाबीला या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशा प्रत्येक मागणीला प्राथम्य मिळेल.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरोजकरून, अन्यथा नेमलेल्या दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसंबधात असलेली मालकांची दायित्वे ही मालाकांचीच दायित्वे असतील.

आयुक्तांकडे हक्कमागण्या करणे.

१७. उपक्रमाच्या संबंधात, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबीसंबधात मालकाविरूद्ध उपदानाच्या रकमेसंबंधात किंवा नोकरकपाती पोटी किंवा काम बंद पडल्यामुळे त्यापोटी मिळावयाच्या भरपाईच्या रकमेसंबंधात केलेल्या हक्कमागणीव्यतिरिक्त इतर कोणतीही हक्कमागणी असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, अशी हक्कमागणी विनिर्दिष्ट तारखेपासून तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे सादर करावी लागेल :

परंतु, तीस दिवसांच्या उक्त कालावधीत हक्कमागणी सादर करण्यास, मागणीदाराला पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबद्दल आयुक्ताची खात्री झाली तर, तो त्यानंतरच्या आणखी तीस दिवसांच्या कालावधीत हक्कमागणी दाखल करून घेऊ शकेल, परंतु त्यानंतर मात्र नव्हे.

हक्कमागण्यांचा प्राथम्यक्रम.

१८. अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधात उद्‌भवणाऱ्या हक्कमागण्यांचा प्राथम्यक्रम पुढील तत्वांनुसार ठरविला जाईल:—

(अ) प्रवर्ग एकचा क्रम इतर सर्व प्रवर्गांच्या वर लागेल आणि प्रवर्ग दोनचा क्रम प्रवर्ग तीन आणि चारच्या वर लागेल आणि प्रवर्ग तीनचा क्रम प्रवर्ग चारच्या वर लागेल;

(ब) प्रवर्ग तीन खेरीज, प्रत्येक प्रवर्गात बिनिर्दिष्ट केलेल्या हक्कमागण्यांचा दर्जा सारखाच राहील व त्यांच्या रकमांची पूर्णतः भरपाई करण्यात येईल, परंतु जर अशा मागण्या पूर्णतः भागवण्यास रक्कम अपुरी असेल तर, त्या मागणीरकमा समान प्रमाणात घट पावतील व त्यानुसार त्यांच्या रकमा चुकत्या करण्यात येतील;

(क) प्रतिभूत कर्जाच्या शर्तीनुसार व अशा कर्जाच्या परस्पर प्राथम्यक्रमानुसार, या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमास अधीन राहून, प्रवर्ग तीन मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली दायित्वांची फेड एका पक्षी राज्य शासनाने, व दुसऱ्या पक्षी बँका व संस्था यांच्या दरम्यान समंत झालेल्या रीतीने फेडण्यात येतील;

(ड) निकटवरच्या प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व दायित्वांच्या रकमा चुकत्या करण्यात आल्यानंतर जर रक्कम शिल्लक राहिली तरच खालच्या प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधातील कोणत्याही दायित्वाची पूर्ती करण्याचा प्रश्न उद्‌भवेल.

हक्कमागण्यांची तपासणी.

१९. (१) कलम १७ खाली केलेल्या हक्कमागण्या आल्यानंतर आयुक्त, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमानुसार त्याची क्रमवारी लावील आणि अशा प्राथम्यक्रमानुसार त्या तपासील.

(२) जर हक्कमागण्याची तापसणी केल्यानंतर आयुक्ताचे असे मत झाले की, या अधिनियमान्वये त्याला देण्यात आलेली रक्कम कोणत्याही खालच्या प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेली दायित्वे भागवण्यास पुरेशी नाही, तर त्याने अशा खालच्या प्रवर्गातील हक्कमागण्याची तपासणी करण्याची आवश्यकता असणार नाही.

२०. (१) अनुसूचीमध्ये घालून दिलेल्या प्राथम्यक्रमानुसार हक्कमागण्यांची तपासणी केल्यानंतर आयुक्त, अशी एक तारीख निश्चित करील की, त्या तारखेला किंवा त्यापूर्वी मागणीदार आपल्या मागणीसाठी पुरावा दाखल करील किंवा त्या मागणीदाराला, आयुक्ताकडून केल्या जाणाऱ्या संवितरणाच्या लाभातून वगळण्यात येईल. हक्कमागण्या स्वीकृत करणे अथवा त्या फेटाळणे.

(२) अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेची कमीत कमी चौदा दिवसांची नोटीस, आयुक्तास योग्य वाटेल अशा इंग्रजी भाषेतील दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात आणि मराठी भाषेतील अशा दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात आणि अन्य प्रादेशिक भाषेतील अशा दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात जाहिरात देऊन देण्यात येईल; आणि अशा प्रत्येक नोटिशीद्वारे, जाहिरातीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत आयुक्ताकडे मागणीहक्काचा पुरावा दाखल करण्यास मागणीदाराला सांगण्यात येईल.

(३) आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये आपल्या मागणीहक्काचा पुरावा दाखल करण्यात कसूर करणाऱ्या प्रत्येक मागणीदारास आयुक्ताकडून होणाऱ्या संवितरणातून वगळण्यात येईल.

(४) आयुक्त, त्याच्या मते आवश्यक असेल असे अन्वेषण केल्यानंतर, आणि मालकांना हक्क मागण्यासंबंधी खंडन करण्याची संधी दिल्यानंतर आणि मागणीदारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे हक्कमागणी पूर्णतः किंवा अंशतः स्वीकृत करील किंवा ती फेटाळून लावील.

(५) आयुक्ताला त्याची कामे पार पाडताना उद्‌भवणाऱ्या सर्व बाबीसंबंधी स्वतःची कार्यपद्धती निश्चित करण्याचा अधिकार राहील—यामध्ये, त्याने त्याच्या कामाकाजाची जागा किंवा कामकाजाच्या जागा ठरवण्याचाही समावेश असेल—आणि या अधिनियमाखाली
१९०८ चा ५. अन्वेषण करण्याच्या प्रयोजनासाठी त्याला "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" खाली दिवाणी न्यायालयामध्ये पुढील बाबीसंबंधातील खटला चालवताना निहित असणाऱ्या अधिकारांसारखेच, अधिकार असतील ते असे:—

(अ) कोणत्याही साक्षीदारास बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे व त्याची शपथेवर साक्ष तपासणी करणे;

(ब) पुरावा म्हणून सादर करण्याजोगा कोणताही दस्तऐवज किंवा इतर मूर्त वस्तू प्रकट करवणे व सादर करणे;

(क) प्रतिज्ञालेखांवर पुरावा स्वीकारणे; आणि

(ड) साक्षीदारांच्या तपासणीकरिता कोणतेही आयोगपत्र काढणे.

१८६० चा ४५. १९७४ चा २. (६) आयुक्तापुढील कोणतीही अन्वेषण कार्यवाही ही "भारतीय दंड संहिता" हिच्या कलम १९३ व २२८ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही मानण्यात येईल आणि "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" कलम १९५ आणि प्रकरण सव्वीस याच्या प्रयोजनार्थ आयुक्त हा दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(७) आयुक्ताच्या निर्णयामुळे समाधान न होणाऱ्या मागणीदारांस अशा निर्णयाविरुद्ध अपील करता येईल व हे अपील, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीमध्ये मालकाचे नोंदणीकृत कार्यालय असेल अशा, मूळ अधिकारितेच्या मुख्य दिवशी न्यायलयाकडे करावे लागेल :

परंतु उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असणारी व्यक्ती ही आयुक्त म्हणून नेमण्यात येईल त्या बाबतीत, असे अपील, मुंबई उच्च न्यायालयाकडे करण्यात येईल आणि अशा अपीलाची सुनावणी व निर्णय त्या उच्च न्यायालयाच्या किमान दोन न्यायाधीशांकडून करण्यात येईल.

आयुक्तांकडून मागणीदारांना होणारे पैशाचे संवितरण.

२१. या अधिनियमान्वये एखादी हक्कमागणी स्वीकृत केल्यानंतर, अशा हक्कमागणीबाबत देय असणारी रक्कम आयुक्त हा, संबद्ध निधीत जमा करील किंवा ज्यांना अशी रक्कम देय असेल त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रदान करील आणि अशा प्रकारे ती जमा करण्यात आल्यानंतर किंवा प्रदान करण्यात आल्यानंतर अशा हक्कमागणीबाबतचे मालकांचे दायित्व पूर्णपणे फिटेल.

मालकांना रकमांचे संवितरण.

२२. उपक्रमाच्या संबंधात आपणाकडे देण्यात आलेल्या पैशातून, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली दायित्वे भागविल्यानंतर कोणतीही शिल्लक राहिली तर आयुक्त ती शिल्लक रक्कम मालकांना देईल.

मालकांच्या मालकीची नसलेली यंत्रसामग्री इत्यादींचा कब्जा पुढे चालू राहणे.

२३. जेव्हा या अधिनियमान्वये कोणतीही यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य मालमत्ता राज्य शासनाच्या, महामंडळाच्या किंवा एखाद्या नवीन शासकीय कंपनीच्या कब्जात आली असेल परंतु ती यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य मालमत्ता उपक्रमाच्या मालाकांच्या मालकीची नसेल तेव्हा राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा अशा शासकीय कंपनीने अशी यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री किंवा अन्य मालमत्ता नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी ज्या अटीवर व शर्तीवर ती मालकांच्या कब्जात होती त्याच अटींवर व शर्तींवर पुढेही कब्जात ठेवणे कायदेशीर असेल.

असंवितरित किंवा मागणी न केलेली रक्कम सर्वसाधारण महसुली लेख्यात जमा करणे.

२४. आयुक्तास दिलेल्या रकमेपैकी एवढी रक्कम आयुक्तांचे कार्यालय अंतिमरीत्या समापित होण्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेस, असंवितरित किंवा विनामागणी शिल्लक राहील अशी कोणतीही रक्कम आयुक्त, त्याचे कार्यालय अंतिमरीत्या समापित होण्यापूर्वी, राज्य शासनाच्या सर्वसाधारण महसुली लेख्याकडे बदली करील, परंतु अशा बदली केलेल्या रकमेसंबंधी कोणतीही मागणी राज्य शासनाकडे, अशा पैशांना हक्कदार असणाऱ्या व्यक्तींकडून केली जाऊ शकेल व ह्या हक्कमागणीवरील कार्यवाही जणू काही ती रक्कम बदली झालेली नाही व हक्कमागणीच्या प्रदानासाठी काढावयाचा कोणताही आदेश हा महसुलांच्या परताव्याचा आदेश आहे असे मानून करण्यात येईल.

## प्रकरण सात

## संकीर्ण

दायित्व ग्रहण.

२५. (१) आयुक्ताने, या अधिनियमान्वये देण्यात असलेल्या रकमेतून, अनुसूचीच्या प्रवर्ग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीमधून उद्भवणाऱ्या मालकाच्या दायित्वाची फेड केली नसेल त्या बाबतीत आयुक्त, फेड न केलेल्या उर्वरित दायित्वाच्या मर्यादेबाबत राज्य शासनास लेखी कळवील आणि राज्य शासन ते दायित्व ग्रहण करील.

(२) राज्य शासनास, पोट-कलम (१) अन्वये शासनाने ग्रहण केलेले कोणतेही दायित्व स्वीकारण्याबाबत महामंडळाला आदेशाद्वारे निदेश देता येईल आणि असा निदेश मिळाल्यानंतर अशा दायित्वाची फेड करणे हे महामंडळाचे कर्तव्य असेल.

अधिनियमाचा अधिभावी परिणाम होणे.

२६. या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक्षम असणाऱ्या इतर कोणत्याही लेखात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या अथवा इतर प्राधिकरणाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असेल तरी, परिणामक्षम असतील.

२७. कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या आपल्या उपक्रमाच्या संबंधात कोणत्याही सेवेसाठी, विक्रीसाठी किंवा पुरवठ्यासाठी मालकांनी केलेली व नियत दिवसाच्या निकटपूर्वी अंमलात असलेली प्रत्येक संविदा, नियत दिवसापासून एकशे ऐंशी दिवस संपल्याच्या दिवसापासून व तेव्हापासून परिणामक्षम असण्याचे बंद होईल अशा या अधिनियमान्वये ज्याकडे असा उपक्रम निहित करण्यात आला आहे अशा राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा अशा नवीन शासकीय कंपनीने कालावधी संपण्यापूर्वी अशा संविदेला लेखी अनुसमंती दिलेली असेल तर ती चालू राहील आणि अशी संविदा अनुसंमत करताना त्यात यथास्थिति, राज्य शासन किंवा महामंडळे किंवा अशा नवीन शासकीय कंपनीने कालावधी संपण्यापूर्वी अशा संविदेला लेखी अनुसंमती दिलेली असेल तर ती चालू राहील आणि अशी संविदा अनुसंमत करताना त्यात यथास्थिति, राज्य शासन किंवा महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी स्वत;ला योग्य वाटेल असा बदल किंवा फेरबदल करू शकेल.

राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा नवीन शासकीय कंपनीने अनुसंमत न केल्यास संविदा परिणामक्षण असण्याचे बंद होणे.

परंतु, राज्य शासन, महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी—

(अ) अशी संविदा ही अत्यंत भारयुक्त अशी आहे किंवा दुर्भावनेने केलेली आहे किंवा राज्य शासनाच्या किंवा महामंडळाच्या किंवा नवीन शासकीय कंपनीच्या हितसंबंधांना ती मारक आहे अशी स्वतःची खात्री झालेली असेल तर तेवढी बाब वगळून; आणि

(ब) संविदेच्या पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय आणि संविदा अनुसंमत करण्यास नकार देण्याची आपली कारणे किंवा संविदेत कोणताही बदल किंवा फेरबदल करण्याची कारणे नमूद केल्याशिवाय,

संविदेला अनुसंमती नाकारणार नाही किंवा संविदेमध्ये कोणताही बदल किंवा फेरबदल करणार नाही.

२८. या अधिनियमान्वये सद्भावनेने केलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेले किंवा होण्याचा संभव असलेले कोणतेही नुकसान धरून केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासन किंवा महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी किंवा त्या शासनाचा, महांडळाचा किंवा नवीन शासकीय कंपनीचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी किंवा राज्य शासनाने, महामंडळाने अथवा नवीन शासकीय कंपनीने प्राधिकृत केलेली अन्य व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

२९. राज्य शासन **शासकीय रापत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या कलमाद्वारे किंवा कलम ३३ व कलम ३४ द्वारे प्रदान केलेले अधिकार वगळता या अधिनियमान्वये त्याने वापरण्याजोगे सर्व किंवा कोणतीही अधिकार, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्तीदेखील वापरू शकेल किंवा वापरू शकतील.

अधिकार सोपवणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणताही अधिकार सोपवण्यात येईल तेव्हा जिच्याकडे असा अधिकार सोपण्यात आला असेल ती व्यक्ती राज्य शासनाच्या निदेशनाखाली, नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली काम करील.

३०. जी कोणतीही व्यक्ती,—

शास्ती.

(अ) उपक्रमाचा भाग असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा, अभिरक्षा किंवा नियंत्रण तिच्याकडे असताना अशी मालमत्ता, राज्य शासनास किंवा महामंडळास किंवा नवीन शासकीय कंपनीस किंवा राज्य शासनाने, महामंडळाने, किंवा यथास्थिति, नवीन शासकीय कंपनीने याबाबत, विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तिनिकायास न देता गैरपणे अटकावून ठेवील; किंवा

(ब) उपक्रमाचा भाग असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा गैरपणे मिळवील किंवा ती ठेवून घेईल; किंवा

(क) तिच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असेल असा उपक्रमाच्यासंबंधीचा कोणताही दस्तऐवज बुद्धिपुरस्सर राखून ठेवील किंवा तो प्रकरणपरत्वे, राज्य शासनाकडे किंवा महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे किंवा त्या शासनाने त्या महामंडळाने किंवा त्या शासकीय कंपनीने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा व्यक्तिनिकायाकडे सादर करण्यात कसूर करील; किंवा

(ड) तिच्या कब्जातील, अभिरक्षेतील किंवा नियंत्रणाखालील उपक्रमविषयक कोणतीही मत्ता, लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज प्रकरणपरत्वे राज्य शासनाकडे, महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे अथवा त्या शासनाने, महामंडळाने किंवा तशा शासकीय कंपनीने विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीकडे किंवा व्यक्तिनिकायाकडे सुपूर्द करण्यात कसूर करील; किंवा

(ई) उपक्रमाचा भाग असणारी कोणतीही मालमत्ता गैरपणे हलवील किंवा नष्ट करील; किंवा

(फ) ती खोटी असल्याचे किंवा अत्यंत चुकीची असल्याचे तिला माहीत असेल किंवा तसे समजण्यात तिला वाजवी कारण असेल अशी कोणतीही हक्कमागणी या अधिनियमान्वये गैरपणे सादर करील.

तिला, दोषसिद्धिअन्ती दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कैदेची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**कंपन्यांनी केलेले अपराध.** ३१. (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीने केलेला असेल त्या बाबतीत, अपराध घडला त्यावेळी कंपनीचा धंदा चालविण्याबद्दल जी जी व्यक्ती कंपनीची हुकुमतदार होती आणि कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ती त्याबद्दल कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा होण्यास पात्र असेल :

परंतु, जर कोणतीही अशी व्यक्ती अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध करील तर, ती या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही शिक्षा होण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध जेव्हा कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मुकअनुमतीने करण्यात आला असेल किंवा त्याने केलेल्या हलगर्जीपणाशी त्यांचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा असेल तेव्हा असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ—

(अ) "कंपनी" म्हणजे, कोणताही निगमनिकाय होय आणि त्यात भागीदारी संस्था किंवा अन्य व्यक्तिसंघ याचा समावेश होतो ; आणि

(ब) "संचालक" म्हणजे, भागादारी संस्थेच्या संबंधात त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, होय.

३२. उपक्रमाच्या संबंधातील कंपनीच्या मालकीचे असलेले जे अधिकार, हक्क व हितसंबंध या अधिनियमान्वये राज्य शासनाकडे किंवा महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे निहित झालेले असतील त्या कंपनीचे परिसमापन करण्याची कार्यवाही, राज्य शासनाची संमती असल्याखेरीज कोणत्याही न्यायालयात दाखल करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही. **कंपनीचे समापन न्यायालयाकडून केले जाणार नाही.**

३३. (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीकरिता **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) कलम ४, पोट-कलम (३) मध्ये निदेश केलेली सूचना आयुक्तास किती मुदतीत कशा रीतीने द्यावयाची;

(ब) कलम १३ खालील कोणत्याही भविष्य निर्वाहनिधीत किंवा अन्य निधीत असलेल्या पैशाची व्यवस्था कशा रीतीने लावावयाची;

(क) विहित करण्याची आवश्यकता असेल किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) ह्या अधिनविमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एका अधिवेशनात अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती अधिवेशने मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर त्यांनी असा निर्णय **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्यावर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्यापूर्वी त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

३४. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल असा आदेश काढून ती दूर करता येईल: **अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

१९८६ चा महा. अध्या. क्र. ५ — ३५. (१) याद्वारे सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हींग अँण्ड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, दि एम्प्रेस मिल्स, नागपूर (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अध्यादेश, १९८६ हा निरसित करण्यात येत आहे. **सन १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ति.**

(२) असे निरसन करण्यात आले असेल तरीही उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही (केलेला कोणताही नियम, आदेश किंवा काढलेली अधिसूचना किंवा केलेली कोणतीही नियुक्ती किंवा काढलेले निदेश यांसह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये यथास्थिति, केल्याचे, काढण्यात आल्याचे किंवा करण्यात आल्याचे मानले जाईल.

## अनुसूची

[कलम २(ह) १७, १८, १९, २० (१) आणि २२ पहा]

**मालकांचे दायित्वे फेडण्यासंबंधातील प्राथम्यक्रम.**

**प्रवर्ग एक.—**

उपक्रमातील कर्मचाऱ्यांना उपदानासह देय असलेल्या सर्व रकमा भविष्य निर्वाहनिधीच्या १९४८
अंशदानाची 'कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८,' याअन्वये मालकांनी द्यावयाच्या चा ३४.
अंशदानासंबंधातील थकबाकी.

**प्रवर्ग दोन.—**

उत्पादन शुल्क, विक्री करातील थकबाकी, विजेसंबंधातील त्यांना देय असलेल्या रकमा आणि स्थानिक प्राधिकरण यांना देय असलेल्या रकमा.

**प्रवर्ग तीन.—**

बँक व संस्था यांसह प्रतिभूत धनको.

**प्रवर्ग चार.—**

(एक) किरकोळ धनको,

(दोन) इतर दायित्वे.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई